
जनसंपर्क कक्ष
20 NOV 2018 पुढारक्रांती शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'महाराष्ट्र आणि महात्मा गांधी' हा वाचनीय आणि संग्राह्य ग्रंथ -कुलगुरू



कोल्हापूर : माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने प्रकाशित केलेला 'महाराष्ट्र आणि महात्मा गांधी' हा ग्रंथ संदर्भमूल्य आणि उत्तम निर्मितीमूल्य असलेला, वाचनीय, विचार करायला लावणारा आणि संग्रही ठेवलाच पाहिजे असा उत्कृष्ट ग्रंथ आहे, असे गौरवोद्गार कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांनी काढले. कोल्हापूरचे विभागीय माहिती उपसंचालक सतीश लळीत आणि जिल्हा माहिती अधिकारी स. रा. माने यांनी आज हा ग्रंथ डॉ. शिंदे यांना भेट दिला. त्यानंतर त्यांनी ग्रंथाबद्दल आपले मत व्यक्त केले. यावेळी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर, शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य मधुकर पाटील व अन्य मान्यवर उपस्थित होते.

20 NOV 2018

पुण्यनगरी

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महाविद्यालयीन निवडणुकीबाबत विद्यार्थी संघटनांत मतमतांतरे

## विद्यापीठ विधेयक २०१६ नुसार निवडणुकीचा मार्ग मोकळा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायद्यामध्ये तरतूद केल्याप्रमाणे पुढील काळामध्ये महाविद्यालय व विद्यापीठांमध्ये विद्यार्थी परिषदेच्या निवडणुका घेतल्या जाणार आहेत. या निवडणुकांमुळे विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची सोडवणूक होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा आहे. या निवडणुकांबाबत विद्यार्थी संघटनांतून विविध मते व्यक्त केली जात आहे.

या निवडणुका समृद्ध व सजग लोकशाहीचे द्योतक असून यामुळे विद्यार्थ्यांमधील नेतृत्वगुण विकसित होण्याच्या दृष्टीने विद्यार्थी परिषद निवडणुका महत्त्वपूर्ण ठरतील. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ विधेयक २०१६ नुसार महाविद्यालय आणि विद्यापीठ निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला आहे. लिंगडोह समितीच्या शिफारशी तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या सूचनेनुसार महाविद्यालयीन आणि विद्यापीठ विद्यार्थी परिषदेच्या निवडणुका होणार आहेत.

गुन्हेगारी वृत्ती वाढू लागल्याने २५ वर्षांपूर्वी महाविद्यालयातील निवडणुकांना बंदी घालण्यात आली होती. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर आधारित विद्यार्थी प्रतिनिधींची निवड करण्याची पद्धत गेली अनेक वर्षे उपयोगात आणली जाते. मात्र, या पद्धतीमुळे चांगले नेतृत्व मिळत नसल्याची तक्रार होत आहे.

या पार्श्वभूमीवर राज्य सरकारनेही महाविद्यालयात निवडणुका घेण्याची प्रक्रिया सुरू करण्यासाठी सकारात्मकता दाखवल्याने विद्यार्थी वर्गात पुन्हा एकदा निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत. निवडणुका घेतल्यामुळे महाविद्यालयांत लोकशाही प्रक्रिया खऱ्या अर्थाने राबवली जाईल, असा आशावाद व्यक्त होत आहे. त्याचबरोबर महाविद्यालयीन शिक्षणात राजकीय आणि अपप्रवृत्तींचा शिरकाव होईल, अशी भीती विद्यार्थ्यांतून व्यक्त केली जात आहे. अनेक विद्यार्थी संघटनांकडून सरकारच्या या निर्णयावर साशंकता व्यक्त केली जात आहे. येत्या शैक्षणिक वर्षात ही निवडणूक घेण्यास टाळाटाळ केली जाईल, अशी भीती विद्यार्थी संघटनांतून व्यक्त केली जात आहे.

### निवडणुकांबाबत साशंकता



महाविद्यालयीन निवडणुका घेण्याचा निर्णय उशिरा झाला असला तरी स्वागतार्ह आहे. शैक्षणिक वर्षात सरकारने निवडणूक घेतली नाही तर कन्हैया कुमार सारखा एखादा नेता अशा निवडणुकीतून उदयास येऊन सरकारला आव्हान देईल, अशी भीती आहे. त्यामुळे पुढील शैक्षणिक वर्षात महाविद्यालयीन निवडणुका होणार की नाही याबाबत साशंकता आहे.

**- पार्थ मुंडे,** जिल्हाध्यक्ष एनएसयूआय

### सरकारकडून फक्त धूळफेक



सरकार सर्वच बाबतीत निर्णय घेते. मात्र, त्या निर्णयाची अंमलबजावणी होत नाही. पुढील शैक्षणिक वर्षात या निवडणुका होतील की नाही, याबाबत शंका आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना त्याचा फायदा होईल, असेही वाटत नाही. सरकार इतर बाबतीमध्ये जशी धूळफेक करते, त्याच प्रकारे महाविद्यालयीन निवडणुकांबाबत धूळफेक सुरू आहे.

**- मंदार पाटील,** मनसे विद्यार्थी शहराध्यक्ष

### विद्यार्थ्यांचे प्रश्न सुटतील



महाविद्यालयातून लोकशाही पद्धतीने निवडणुका घेण्याचा सरकारचा निर्णय चांगला आहे. लवकर हा निर्णय घ्यावा, अशी आमची मागणी आहे. विद्यार्थी प्रतिनिधींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे विविध प्रश्न सुटतील, अशी आशा आहे. या निवडणुकीत चुकीचे प्रकार घडू नये, अशी भावना आहे.

**- प्रशांत आंबी,** जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशन

### नवे नेतृत्व उदयास येईल



विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी निवडणुकांतून आलेल्या प्रतिनिधींद्वारे नक्कीच प्रयत्न केले जातील. या निवडणुकांमुळे सर्वसामान्य नेतृत्व उदयास येणार आहे. महाविद्यालयातील तरुणांमध्ये लढण्याची क्षमता निर्माण होणार आहे. तसेच तथाकथित नेते आणि घराणेशाहीला यातून आळा बसून समाजाला नवे नेतृत्व प्राप्त होईल.

**- साधना वैराळे,** अभाविप, प्रदेश सहमंत्री

लोकमत

## शिवाजी विद्यापीठातील गुणवत्ता अभियान : वर्धापनदिनी पुरस्काराने सन्मानित

# सभा, विशेष कक्षासह सहा विभाग अव्वल

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील सभा, विशेष कक्ष, प्रश्नपत्रिका वितरण, परीक्षा देयके, आरोग्य केंद्र, नॅनो सायन्स टेक्नॉलॉजी विभाग प्रशासकीय गुणवत्ता अभियान आणि गुणवत्ता पुरस्कार योजनेमध्ये अव्वल ठरले. या विभागांना विद्यापीठाच्या ५६ व्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमात रविवारी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

विद्यापीठाच्यावतीने दि. २४ सप्टेंबर ते दि. ३ ऑक्टोबरदरम्यान हे अभियान राबविण्यात आले. त्यामधील प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या अधिपत्याखालील विजेते विभाग (विजेत्यांची नावे प्रथम, द्वितीय, तृतीय आणि उत्तेजनार्थ अशी) : कुलसचिव - सभा विभाग, विद्यार्थी विकास विभाग. प्र-कुलगुरु - विशेष कक्ष, संलग्नता टी-२. परीक्षा व मूल्यमापन मंडळ - प्रश्नपत्रिका वितरण, मध्यवर्ती मूल्यमापन विभाग. वित्त व लेखाधिकारी - परीक्षा देयके विभाग, कॅश बुक विभाग. सपोर्ट सर्व्हिसेस- आरोग्य केंद्र, ज्ञानस्रोत केंद्र, मुलांचे वसतिगृह, युसिक. पदव्युत्तर अधिविभाग - नॅनो सायन्स टेक्नॉलॉजी, पर्यावरणशास्त्र, संख्याशास्त्र, भौतिकशास्त्र अधिविभाग. या विभागांना रविवारी वर्धापनदिनाच्या कार्यक्रम जळगाव येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. पी. पाटील यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे उपस्थित होते.

### या गुणवंत पाल्यांचा सत्कार

या कार्यक्रमात मेघना बांदिवडेकर, उल्का चरापले, स्वप्निल बंडगर, मंगेश देसाई, रचना घावरे, स्वरदा भूतकर, भक्ती पाटील, आरती शिंदे, ईश्वरी कुंडले, ऋतुजा खोत, अनुप पाटील, विपुल लोखंडे, विशाल वालकोळी, वैभवी मोहाडीकर, शुभम कदम, अक्षदा पाटील, आदिती शेळके, सोम देवरुखकर, संस्कार चव्हाण, सोमनाथ तोरसे, अरुणा लोंढे, आदित्य परीट, सानिका पोवार, गौरी शेळके, प्रियंका दौंड, वेदांत बिजले, स्वरुपा बिलावर, सिद्धराज माने, नयन हंकारे, निरंजन खामकर, संहिता हेगडे, ऋतिका वंगार, ईश्वरी खामकर, तेजस्विनी कोळेकर, आदित्य सावळकर, मितेश कुंटे या गुणवंत पाल्यांचा सत्कार करण्यात आला. विशेष प्रावीण्य मिळविलेल्या डॉ. सुनील बिर्जे, डॉ. राजेंद्र खामकर, नंदकुमार झांजगे या सेवकांचा सत्कार झाला.

सकाळ

# माजी विद्यार्थ्यांनी केलं 'जगणं लाईव्ह'चं स्वागत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी 'सकाळ'चा 'जगणं लाईव्ह' अंक दाखवताना.

**पुनाळ, ता. १९ :** शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरच्या २००१ च्या एमएच्या माजी विद्यार्थ्यांनी 'सकाळ'च्या 'जगणं लाईव्ह' या दिवाळी अंकाचे स्वागत केले. शिवाजी विद्यापीठ येथे एम.ए.ला एकत्र शिक्षण घेत असलेले व व्हॉट्स ॲपच्या माध्यमातून एकत्र आलेले विद्यार्थी आज शिवाजी विद्यापीठात जमले.

विविध उच्चपदस्थ असलेल्या या माजी विद्यार्थ्यांनी सामाजिकता जपत समाजकार्यातही बऱ्यापैकी आपला ठसा उमटवला आहे. पाच जिल्ह्यांतील या माजी विद्यार्थ्यांच्या वाचनात यंदाच्या आगळ्यावेगळ्या दिवाळी अंकाविषयी सोशल मीडियावर माहिती मिळाली. त्यामुळे खासकरून 'सकाळ' शहर कार्यालयातून अंक नेण्यात आले.

समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोचून शोषित, पीडित, दुर्लक्षित घटकांना शासन दरबारी प्रकाशात आणण्याचे काम 'सकाळ'ने केले आहे. त्यामुळे बॅरिस्टर खर्डेकर ग्रंथालयासमोरील बागेत या दिवाळी अंकाचे वाचन करण्यात आले.

यामधील माजी विद्यार्थी व चाटे समूहातील जितेंद्र कोले म्हणाले, ''सामाजिक उपक्रमात 'सकाळ' नेहमी अग्रेसर असतो. 'जगणं लाईव्ह' या अंकातील बातमीदारांचे कष्ट व समाजातील दुर्लक्षित घटकांवर शासनाचे लक्ष वेधले असल्याने हा अंक सर्वांगसुंदर झाला आहे.''

यावेळी बाळकृष्ण गणाचारी (चंदगड), सुरेश कांबळे (चंदगड), सुनील कोरे (कागल), धनाजी पाटील (पन्हाळा), शोभा पट्टनकुडे (चिक्कोडी), अस्मिता कांबळे (चिपळूण), प्रियंवदा बेविनकट्टी (फलटण), अनुपमा कामत (कणकवली) आदी उपस्थित होते.